# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/2010/35320 संपादक : बंडूकुमार धवणे Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १६ ◆ अंक १८ ◆ अमरावती ◆ दि. २८ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२५ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


## महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा एकत्रित साहित्यातून नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई, दि. २६: क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा त्यांच्या एकत्रित साहित्याच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत जाईल. या साहित्यामुळे नवीन पिढीला प्रेरणादायी दिशा मिळून यशस्वी होण्याचा मार्ग मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाड्मयाचे प्रकाशन करण्यात आले. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाज्योती संस्थेमार्फत ह्या महावाङ्मयाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नव्या संकेतस्थळाचे उद्घाटनही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मंत्रिमंडळातील अन्य मंत्री तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यामध्ये महात्मा फुले यांचे २३ आणि सावित्रीबाई फुले यांचे १४ ग्रंथ, त्यांचा पत्रव्यवहार तसेच महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचा समावेश आहे. पुण्यातील महात्मा फुले वाडा आणि साताऱ्यातील नायगाव येथील सावित्रीबाईंच्या शिल्पसृष्टीची रंगीत छायाचित्रे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मान्यतेने हा ग्रंथ प्रकाशित झाला असून, एकूण २७ हजार प्रती छापण्यात आल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ७५० प्रतींचे वितरण जिल्हास्तरीय शिक्षण विभाग, आर्थिक विकास मंडळ तसेच आश्रमशाळा व वसतिगृहांमार्फत करण्यात येणार आहे.

विभागाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून विभागाच्या सर्व योजना, शिष्यवृत्ती, वसतिगृहे तसेच विविध शासकीय उपक्रमांची माहिती नागरिकांना एका ठिकाणी सहज उपलब्ध होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले हे संकेतस्थळ वापरकर्त्यांसाठी सोयीस्कर, सुलभ असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### जमापूर येथे भरदिवसा ७ लाख ४५ हजारांची चोरी

चांदूरबाजार : चांदूरबाजार,अचलपूर मार्गावरील जमापूर (शिरजगाव बंड) येथील एका घरात भरदिवसा चोरीची मोठी घटना घडली. चोरट्यांनी तब्बल ७ लाख ४४ हजार ८६२ रुपयाचा मुद्देमाल लंपास केला.घटनेचे वेळी फिर्यादीची पत्नी व मुलगी घराला कुलुप लावुन सेंट्रल बँक ऑफ इंडिया शिरजगाव बंड येथे गेली असता अज्ञात इसमांनी घराच्या मुख्य लोखंडी दरवाज्याची कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला व घरातून २,४४,८६२ रुपयांचे सोन्याचे दागीने व रोख रक्कम ५ लाख असा एकुण ७,४४,८६२ रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. घटनेदरम्यान गुलाबी टी-शर्ट घातलेला, ठेंगणा व अनोळखीव्यक्ती घराजवळ बसलेला दिसला होता. अशी माहीती प्रत्यक्षदर्शीनी दिली. घटनेची माहिती मिळताच थानेदार अशोक जाधव यांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. चोरी व घरफोडीच्या वाढत्या घटना घडत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.दरम्यान, सतत वाढत्या चोऱ्या, दुचाकीच्या चोऱ्या, घरफोडी अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे परिसरात सीसीटीव्ही बसविण्याची जोरदार मागणी होत आहे. फिर्यादी मोहम्मद ताज अब्दुल राऊफ (५७, जमापूर) यांचे तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्यां विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळावर श्वानपथक बोलावण्यात आले होते.

## वाहतुकीस बंद उड्डाण पुलावरून युवक काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा





अमरावती : रेल्वे रुळामुळे दोन भागांमध्ये विभागल्या गेलेल्या व अमरावती शहराला जोडणारा अत्यंत महत्त्वपूर्ण रेल्वे उड्डाणपूल रविवारी रात्रीपासून सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करण्यात आल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. प्रशासनाने नागरिकांना विशासात न घेता सदर पूल बंद केल्याचा आरोप करीत काँग्रेसने आंदोलनाचा इशारा दिला आहे. लाखो अमरावतीकरांना प्रभावित करणाऱ्या या मुद्द्याकडे लोकप्रतिनिधीनी दुर्लक्ष केल्याचा आरोप देखील काँग्रेसच्या वतीने करण्यात आला आहे. रेल्वे स्थानक ते राजकमल, जयस्तंभ चौक, राजकमल ते रेल्वे स्थानक व हमालपुरा या मार्गांना जोडणारा व वाहतुकीसाठी अत्यावश्यक रेल्वे उड्डाणपूल रविवारी मध्यरात्रीपासून वाहतुकीस बंद करण्यात आल्याने सोमवारी शहरात दिवसभर व उशिरा रात्रीपर्यंत वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. शालेय विद्यार्थी व रुग्णवाहिकांना देखील या कोंडीचा फटका बसला. यामुळे प्रशासनावर टीकेची झोड उठली असतानाच युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आज मंगळवारी तातडीने पत्र परिषद घेऊन लोकप्रतिनिधी व प्रशासनावर आरोप केले. सदर पूल वाहतुकीस योग्य नसल्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करणारी यंत्रणा ही शासनमान्य आहे का, असा प्रश्न देखील त्यांनी पत्रपरिषदेत केला. एका ऑडिट अहवालावरून संपूर्ण वाहतूक बंद होत असताना सदर अहवाल व ऑडिट करणाऱ्या संस्थेची शासनाने नेमकी कोणती शहानिशा केली, असा प्रश्न त्यांनी केला. ऑडिट करणारी संस्था शासन मान्यता प्राप्त आहे कां, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. पुलावरील वाहतूक बंद केली असली तरी खालून होणारी वाहतूक तशीच सुरू आहे. त्यामुळे खालून होणाऱ्या वाहतुकीस धोका नाही कां, असा प्रश्न उपस्थित होत असल्याचे युवक काँग्रेसने म्हटले आहे. लोकप्रतिनिधी व प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केले आहे. व्यापारी संघटना, शिक्षण संस्था, विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहतूक संघटना, सुजाण नागरिक, लोकप्रतिनिधी व नेत्यांशी कोणतीही चर्चा न करता प्रशासनाने रात्रीतून हा पूल कां बंद केला, यामागे नेमके राजकारण काय, असा प्रश्न युवक काँग्रेसने केला आहे. सदर उड्डाणपूल बंद करण्यात आल्यामुळे गणेशोत्सव व त्यानंतर अमरावती येथील नवरात्रोत्सवातील वाहतुकीचा बिकट प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे सदर पुलाचे मान्यताप्राप्त संस्थेद्वारे ऑडिट करण्यात यावे, स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये चूक नसल्यास त्यावरून वाहतूक सुरू करण्यात यावी, पालकमंत्र्यांनी याबाबत बैठक घेऊन योग्य दिशा निर्देश द्यावे, अशी मागणी युवक काँग्रेसने केली. दरम्यान, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांचा घेराव घालण्याचा इशारा युवक काँग्रेसने दिला आहे. पत्र परिषदेला माजी नगरसेवक मुन्ना राठोड, युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, समीर जवंजाळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# सामाजिक सौहार्द समाजाला लाभू दे!

*श्री गणेशाची स्थापना घरोघरी आणि गणेश मंडळात झाली आहे. 'गणेशोत्सव' हा आता 'राज्य महोत्सव' झाला आहे. या दिवसात सगळीकडेच आनंदाचे वातावरण पाहायला मिळते. सगळे गाव रोषणाईने उजळून निघत असते. यात भर पडते ती डीजेच्या कर्णकर्कश आवाजाची आणि लेझरच्या धोकादायक किरणांची! आतातर याची लोकांना सवय करून घ्यावी लागते आहे. या आवाजाचा वयोवृध्दलोकांना भयंकर त्रास होतो आहे. आजारी लोकांचा तर विचारच केला जात नाही. कायद्याने, नियमाने आवाजावर मर्यादा घालून दिलेली आहे; परंतु कायदे, नियम पायदळी तुडवून आपले प्रदर्शन सुरूच ठेवण्यात बरीच गणेश मंडळे धन्यता मानीत असतात. यात ती आघाडीवर असतात. यावर कुणाचाही अंकुश राहत नाही. लोकांच्या उत्साहापुढे पोलीस यंत्रणा हतबल ठरत असतात, कारण या गणेश मंडळांना लोकप्रतिनिधी, नगरसेवक, व्यापारी आणि पदाधिकाऱ्यांचे आर्थिक पाठबळ लाभत असते. सामान्य जनतेकडून सुद्धा देणगी स्वरूपात पैसा वसूल केला जातो. तो कधी स्वमर्जीने, तर कधी जबरदस्तीने केला जातो ही बाब सार्वजनिक झाली आहे.सार्वजनिक गणेश उत्सव ही सामाजिक संकल्पना आहे. खरेतर समाजाचे भान ठेवून गणेश उत्सव साजरा करणे याला गणेश मंडळातील पदाधिकाऱ्यांची प्राथमिकता असली पाहिजे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी गणेश उत्सवाला सार्वजनिक स्वरूप प्रदान करण्यामागे जनजागृतीचा मूळ उद्देश होता. आज तो उद्देश मागे पडलेला आहे. याची जागा व्यापारीकरणाने घेतलेली आहे.देशामध्ये, राज्यामध्ये अनेक समस्या अस्तित्वात असताना त्या या माध्यमातून उजागर करणे आवश्यक झाले आहे. वायफळ मनोरंजन आणि अनावश्यक खर्च हा टाळला गेला पाहिजे. कमीत कमी खर्चामध्ये गणेशोत्सव साजरा झाला पाहिजे. यातून जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन झाले पाहिजे. आज संपूर्ण देशामध्येभ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. कुणाचा पायपोस कुणाला नाही. 'हम करे सो कायदा' या वृत्तीने सगळेजण वागत आहेत. यामुळे सामान्यजनांचा कुणीही वाली राहिलेला नाही. कुणाचा कुणावर विश्वास राहिलेला नाही. प्रत्येकजण संशयित नजरेने एकमेकांकडे बघतो आहे. जनतेची कुठलीही कामे नियमानुसार होत नाहीत. ती चिरीमिरी देऊनच करावी लागतात. याबाबत प्रशासनिक लोकांना, शासनकर्त्यांना, राज्यकर्त्यांना चांगली बुद्धी दे ! 'गणेश उत्सव' हा अनावश्यक प्रदर्शनाचा, मनोरंजनाचा भाग होता कामा नये, सार्वजनिक उत्सवात मग तो कोणताही उत्सव असो यातून जनतेचे प्रबोधन झाले पाहिजे. प्रबोधनात्मक कार्यक्रमातून मनोरंजन साधले गेले पाहिजे. खेळ कुद, कला, विज्ञान, इतिहास, गायन इ. यावर भर दिला गेला पाहिजे. धार्मिक कार्यक्रमात धार्मिक नियमांच्या विरोधात आचरण करता कामा नये. याकडे सरकारी यंत्रणांचे लक्ष असले पाहिजे. चुकीच्या बाबतीत कुठलेही राजकारण न साधता कारवाई झाली पाहिजे.आज लोकांना साधेपणाने जगणे कठीण झाले आहे. सरळ झाडांना सहज कापता येते. तशीच गती सरळपणे वागणाऱ्या माणसांची आज झालेली पाहायला मिळते आहे. याचे कारण आपली बुद्धी शेण खायला जाते आहे. कारण नसताना लोकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व न्यायिक पिळवणूक केली जात आहे. यात सुधारणा होण्यासाठी तू नैतिक बुद्धी दे ! नैतिकतेचे अध:पतन झाल्याने देशातील राज्यकर्ते, लोकसेवक, व्यापारी, उद्योजक आणि नोकरशहा जनतेची आर्थिक लूट वेगवेगळ्या मार्गाने करीत आहेत. त्यांना सुबुद्धी दे ! देशातील भ्रष्टाचार कमी होण्याची सुबुद्धी दे! लोकांना वेळेवर न्याय मिळवून देण्याची सुबुद्धी दे! जनतेला आळशी बनवून ठेवण्याची दुर्बुद्धी आमच्या राज्यकर्त्यांना देऊ नको. त्यांची बुद्धी वठणीवर आण ! नाहीतर तुझ्या नावाने गोंधळ घालून जनतेची लूट ही अशीच चालणार आहे. करिता तुझ्या खऱ्या भक्तांचे एकच मागणेआहे, या सर्वांना सुबुद्धी दे आणि सामाजिक सौहार्द समाजाला लाभू दे!*

# वावर है तो पावर है !



आपला भारत देश कृषीप्रधान देश आहे. आपला देश खेड्यांमध्ये वसलेला आहे. आपल्या देशाचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. शेतकरी हा आपल्या भारत देशाचा अन्नदाता आहे. शेतकरी जेव्हा राबराब शेतात कष्ट करतो, तेव्हाच आपण आपले सर्वजण पोट भरू शकतो. म्हणून तर आपण शेतकऱ्याला अन्नदाता म्हणतो. जेव्हा-जेव्हा आपण जेवणाने तृप्त होतो, तेव्हा-तेव्हा आपण 'अन्नदाता सुखी भव' असे सहजच म्हणतो, ते काही उगाच नाही.

आपल्या देशाचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे जास्त रोजगार हा शेतीवरचं अवलंबून आहे. शेतमजूर आपल्या देशात मोठ्या प्रमाणात आहेत. एव्हढे सगळे असून सुद्धा शेतकरी हा दुःखीच आहे. त्याला कारण हेच आहे की त्याच्या शेतीच्या उत्पन्नाची कधीच शाश्वती नसते व त्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. जो पर्यंत शेतीचे उत्पन्न हे शेतकऱ्याच्या घरी, गोडाऊन किंवा बाजारात विकल्या जात नाही तो पर्यंत त्याचा जिवात जीव नसतो. एकदा का त्याचा माल विकला गेला की तो निश्चिन्त होतो.

जरी आपला देश कृषीप्रधान असला तरी सर्वांकडे शेती आहे असे अजिबातच नाही. शेतीवर जीवन जगणारे संख्येने खूप मोठ्या प्रमाणात आहेत. शेतमजूर खूपच मोठ्या प्रमाणात आजही आहेत. अगोदर आपल्याकडे सावकार, पाटील ही उपाधी असणारे बरेच होते. यांच्याकडे खूप मोठ्या प्रमाणात शेती असायची. ही मंडळी मोठ्या अभिमानाने सांगायची की जिथपर्यंत आपली नजर जाते ना, तिथपर्यंत आपली शेती (वावर) आहे.

शेतमजूर शेतात खूप राबत असतात. अहोरात्र राबून त्यांना त्यांचा योग्य तो मेहनताना मिळत नसायचा. त्यामुळे त्यांची एकच इच्छा असायची की आपल्या मालकीची शेती (वावर) असली पाहिजे. एक-दोन का एकर असेना ती आपल्या मालकीची असली पाहिजे. आपल्या नावावर वावर असले पाहिजे. आपले वावर असले की आपल्या मनाने, मर्जीने आपण वावरात पिक घेऊ शकतो. अधिक मेहनत करून, अधिक उत्पादन काढून आपले कुटुंब सुखी करू शकतो. ह्या शेतकऱ्याची, शेतमजुरांची एकच इच्छा असते की वावर आपले असले पाहिजे, आपल्या मालकीचे असले पाहिजे. ह्या त्याच्या स्वप्नासाठी तो कायम आपल्या जीवनात धडपडत असतो.

जमिनीसाठी, शेतीसाठी बरेच वाद, तंटे, भांडण एव्हढेच काय तर जीव घेण्यापर्यंत, खून सुद्धा झालेले आहेत. उद्देश्य एकच वावर आपल्या नावाने असले पाहिजे. त्याची पक्की धारणा झाली असते, वावर असले की पावर असते. तो सतत त्याच मानसिकतेत वावरत असतो.

मोठे शेतकरी कुटुंब असलेले वाटण्यासाठी त्यांचे वाद, भांडणे व तंटे आपण बघितले आहेत. कोर्टामध्ये अजूनही बरेच वाद प्रलंबित सुद्धा आहेत. मोठ्या शेतकरी कुटुंबाचे अनेक वाटण्या होऊन छोटे-छोटे तुकडे झालेले आपण बघितले आहेत. ह्या छोट्या-छोट्या शेतीच्या तुकड्यांची नंतर विक्री होऊन ते सुद्धा शेतीहीन झालेले बघितले आहे. म्हणजे 'वावर गेले, पावर गेली' अशी त्यांची गत झालेली आहे.

वावर पाहिजे, वावर पाहिजे हे म्हणत त्याचे छोटे छोटे तुकडे विकून परत एकदा हे कुटुंब कंगाल झालेले आहेत. पण हे सर्व असले तरी अजून ही वावर पाहिजे. कारण की, सर्वानाच माहित आहे 'वावर है तो पवार है' ! आणि खरोखरच ह्यात काही दुमत नाही की वावरात ही पावर असतेच. म्हणून अगोदरच्या काळी थोडे का असेना वावर असले पाहिजे असे म्हणायचे ते उगीच नाही. बऱ्याच जणांनी आपले खेडे गावातील वावर विकून शहरात मोठे-मोठे घरे, फ्लॅट्स घेतले आहेत. ही सगळी शहरे समृद्ध झालीत ती वावराच्या भरवशावरच. म्हणून तर म्हणता येईल वावर होते म्हणून तर एव्हढी शहरात पावर आली ना?

लोकांनी आपले वावर विकले आणि शहरात नौकऱ्या करणे पसंद केले. त्यांच्या आई-वडिलांनी मोठ्या कष्टाने कमावलेली शेती शेवटी कवडीमोल किमतीने विकून मुलाच्या नौकरीसाठी आपल्या कष्टाचे बलिदान केले आहे. अशा बऱ्याच जणांना वावर विकून नौकऱ्या मिळालेल्या आहेत. वावर होते म्हणूनच नौकऱ्या मिळाल्या ना ! मग खरे आहे की,'वावर है तो पावर है'! परंतु अजूनही ज्यांनी ज्यांनी नौकाऱ्यांसाठी वावर विकले, त्यांची पावर कमी झाल्याचे त्यांना अजूनही खंत आहे. त्यांना त्यांचा आधार आणि पावर गेल्यामुळे ते आज दुःखात जीवन जगत आहेत.

हा झाला एक वावराचा मुद्दा. एक भाग, एक दृष्टिकोन, एका वावराचा करिश्मा, चमत्कार, जादू. आता आपण वावराचा दुसरा भाग बघू या. बघू या वावाराचा काय करिश्मा, जादू चमत्कार आहे तो ? हा दुसरा वावर आहे तरी काय ?

हा वावर दुसरा तिसरा काही नसून, वावर म्हणजे आपला सर्वत्र असलेला संचार होय. जनसामान्यात, लोकांमध्ये, परिवारांमध्ये व मित्र परिवारांमध्ये मिसळणे होय. ज्याचा जनसंपर्क जास्त असतो त्याला आपण त्याचा वावर जास्त आहे असे म्हणतो.

ह्या व्यक्तीला सर्वजण मानतात, भाव देतात, सन्मान देतात. यांची सर्वत्र वाह वाह होत असते. यांना दादा, भाऊ व बॉस असल्याप्रकरची उपाधी सुद्धा दिली जाते. कारण की यांचा समाजामध्ये जास्त वावर असतो. ह्याला सर्वजण ओळखत असतात. हा सर्वांना ओळखत असतो. ह्याची सगळीकडे ओळखी असते. घरातून एकदा निघाला, तर ह्याचा हात हा नेहमी अभिवादनासाठी वरतीच असतो. ज्याचा वावर जास्त, त्याची ओळख जास्त असते. त्याचे लायजनिंग सगळीकडे जास्त असते. ह्या ओळखीचा त्याला आणि इतरांना सुद्धा फायदा होतो. जे काम पैसे देऊन ही होत नाही ते ओळखीने होते, अर्थात ते अधिक वावरानेच होत असते.

ज्याचा वावर जास्त असतो तो सर्वसाधारणपणे हे पुढारी, नेते किंवा राजकारणी मंडळी असतात. यांना कायम लाईम लाईटमध्ये असणे फार गरजेचे असते. म्हणजे काय, तर यांचा नेहमी वावर असणे फार गरजेचे असते. जास्त वावर असणाऱ्या व्यक्तीला 'सिलेब्रिटी' म्हणून संबोधिले जाते.

ज्याचा संपर्क जास्त म्हणजेच वावर जास्त, त्यांना सर्वसाधारण पुढारीपण प्राप्त होतं. त्याला राजकारणात आणि समाजकारणात अधिक पसंदी आणि लोकप्रियता प्राप्त होतं असते. त्यालाच राजकारणात राजकीय पक्षाचे तिकीट दिल्या जातं.

बऱ्याचदा नवशिक्या उमेदवाराला म्हटल्या जातं वावर वाढव, संपर्क वाढव म्हणजे त्याचा त्याला फायदा होईल, लोकांच्या संपर्कात राहशील. ह्या तंत्रज्ञानाच्या युगाच्या अगोदर फक्त लोकांमध्ये मिसळून भेटी देऊन संपर्क अर्थात वावर वाढविला जायचा. परंतु आता ह्या तंत्रज्ञानाच्या युगात संपर्काची साधने हे खूप वाढलेली आहेत. त्यात सोशल मीडिया हा अग्रस्थानी आहे. आता सोशल मीडियाचा आधार घेऊन अधिकाधिक वावर वाढविल्या जातो. सतत जनतेच्या संपर्कात राहण्याचा मुद्दाम प्रयत्न केला जातो. ह्या व्यतिरिक्त विविध शिबिरे, मेळावे सुद्धा आयोजित केल्या जातात आणि ह्या द्वारे सुद्धा अधिकाधिक वावर वाढविला जातो. वावर म्हणजे काय तर सतत जनतेच्या संपर्कात राहणे. जनतेला ह्या ना त्या कारणाने बांधून ठेवणे, आपल्या विचाराशी बांधून ठेवणे होय.

हा वावर सतत ठेवल्यामुळे माणूस नेता, पुढारी बनतो व तो नेतृत्व सुद्धा करतो. एव्हढंच काय तो आमदार, खासदार व मंत्री सुद्धा बनतो. ह्या वावरामुळे त्याला मानसन्मान सुद्धा मिळतो.

एकवेळ भौतिक वावर तुमच्याकडे नसले तरी चालेल ह्यात काही दुःख मानून घेण्याचे कारण नाही, पण संचार करणारे वावर मात्र आपल्याकडे असलेच पाहिजे. ह्यामुळे सर्वांना आनंद देता येईल. अपेक्षा करू या की आपले संचार करणारे वावर अधिक बहरू दे व त्याला चांगली फळे व फुले येऊ दे. जेणेकरून संचार करणारे वावर बघून सर्वत्र आनंद दरवळेल. तर चला, ह्या संचार करणाऱ्या वावरची लागवड करू या . ह्यात चांगले बी-बियाणे व पोषक खतांचा पुरवठा करु या, जेणे करून सर्वत्र सुकून दरवळेल.

आहे ना हा सुद्धा वावर पावरफुल ! आपण दोन्ही वावरांची पावर बघितली. दोघेही अगदी पावरफुल आहेत. त्याची शक्ती ही अफाट आहे आणि ती सदासर्वकाळ ही कायमच राहत आली आहे व राहील सुद्धा. म्हणून आपला वावर वाढावा, आपण सक्रिय असलो पाहिजे व आपली पावर वाढवून पावरफुल बनलो पाहिजे. म्हणून वावर है तो पावर है हे अगदी संयुक्तिक आहे ना !



**अरविंद सं. मोरे**
**नवीन पनवेल (पूर्व)**
**मो. ९४२३१२५२५१**

# तळेगाव पोलिसस्टेशन परिसरात बाप्पाचे आगमन मोठ्या उत्साहात

तळेगाव दशासर येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्ष सार्वजनिक १० गणपती मंडळे आहेत व तळेगाव पोलिस स्टेशनच्या प्रभागात इतर गावांत दहा सार्वजनिक गणपती मंडळे आहे. या सर्व २० ही सार्वजनिक मंडळामध्ये बाप्पाचे आगमन मोठ्या उत्साहात, जल्लोषात व शांततेने झाले आहे.यावर्षी नवीन गणपती मंडळांना परमिशन दिल्या गेली असून ती कुण्या नवीन गणपती मंडळाने मागितली नाही व गणपती विसर्जनाच्या दिवशी मिरवणुकीचा जो रूट होता, तोच कायम ठेवला गेला आहे. शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता तळेगाव पोलिसस्टेशनने दोनदा सर्व गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांची मीटिंग बोलावली होती. त्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता ज्या ज्या गोष्टी कराव्या लागतात, त्याची इत्यंभूत माहिती व मंडळाची जबाबदारी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

त्याचप्रमाणे २६ ऑगस्टला तळेगाव येथील शांतता कमिटीचीसुद्धा बैठक बोलण्यात आली. यामध्ये या गणपती उत्सवात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता ठाणेदार किरण आवटे यांनी सर्व शांतता कमिटीचे सदस्यांना आवाहन व सहकार्य करण्याचे सांगितले होते.

# दुचाकीसह आरोपीस अटक

## बडनेरा पोलीसांची कामगिरी



अमरावती : दुचाकी चोरी प्रकरणात पोलीसांनी एका आरोपीस अटक केली. पोलीसांनी चोरी गेलेली दुचाकी जप्त केली. बडनेरा पोलीसांनी ही कारवाई केली. याप्रकरणात फिर्यादी नामे उमेश रामचंद्र वाठ (५२,रा. तेलीपुरा जुनीवस्ती बडनेरा ता.जि.अमरावती) यांनी बडनेरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. १७ तारखेला रोजी दुपारी १२ वाजताचे दरम्यान, काटआमला रोडवर असलेले शेतात काम करण्याकरीत त्यांची दुचाकी (क्र. एमएच २७ सी. जे ३०५२) ते घेवून गेले होते. पावसामुळे त्यांचे वाहन रोडवर हॅन्डेल लॉक करून शेतात काम करण्याकरीता गेले होते. त्यानंतर ते परत आले असता त्यांना त्याचे वाहन त्या ठिकाणी दिसुन आले नाही. त्यांनी आजुबाजुला शोध घेतला परतु त्यांचे वाहन मिळुन आले नाही. दुचाकी चोरी गेल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी बडनेरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलीसांनी अज्ञात चोरट्याविरोधात कलम ३०५ (ब) भारतीय न्याय संहीता प्रमाने गुन्हा दाखल करून तपासात घेतला. सदर गुन्हयांचे तपास पोलीस निरीक्षक सुनील चव्हान यांचे आदेशाने पोस्टेचे डीबी पथक यांनी सुरू केला व गुप्त बातमीदारचे माहीतीवरून आरोपी नामे जुगनुसिंग महिपालसिंग बावरी (३९, रा. शिवाजी नगर नवीवस्ती बडनेरा ता. जि. अमरावती) यांना पंचासमक्ष ताब्यात घेतले व त्यास विशासात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली. सदर गुन्हयातील चोरी गेलेली दुचाकी जप्त करण्यात आली.

# साळ्यानेच दिली जावयाला मारण्याची सुपारी

## ५ लाख रुपयांमध्ये ठरला व्यवहार । अतुल पुरी हत्याकांडात आरोपींची संख्या ८

अमरावती : बडनेरा शहरात चार दिवसांपूर्वी घडलेल्या अतुल पुरी हत्याकांडाचा तपास करताना साळ्यानेच जावयाला मारण्याची सुपारी दिल्याची खळबळजनक माहिती पोलिसांना मिळाली आहे. याप्रकरणी मृतक अतुल पुरी यांचा साळा राहुल पुरीसह आणखी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या आता आठझाली आहे. राहुल पुरीने त्याचा जावई अतुल पुरी याला मारण्यासाठी अक्षय शिंपी याला ५ लाख रुपये दिल्याचे उघड झाले आहे. नंतर गौरवने अक्षय शिंपीमार्फत मारेकऱ्यांना २ लाख रुपये देण्याचे ठरवले होते. गुन्हेशाखेच्या पथकाने राहुल पुरीसह प्रशांत वन्हाडे आणि गौरव कांबे यांना अटक केली. या प्रकरणात अक्षय शिंपी अजूनही फरार असल्याचे सांगितले जात आहे. त्याचा



शोध सुरू आहे.अतुल पुरी हे बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा शहरातील महाविद्यालयात लिपिक होते. ते अमर कॉलनीत राहत होते.

२२ ऑगस्ट रोजी ते आपल्या दुचाकीने बडनेरा रेल्वेस्थानकाकडे निघाले. यादरम्यान हल्लेखोरांनी त्याला वाटेत थांबवले आणि त्याच्यावर चाकूने वार केले आणि त्याची हत्या केली. याघटनेत, दुसऱ्याच दिवशी साहिल ऊर्फ गोलूहरी मोहोडआणि अक्षय विजय लांडे नावाच्या तरुणांना अटक करण्यात गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. पोलिसांनी यवतमाळ जिल्ह्यातील माणिकवाडा धनज येथील रहिवासी राहुल भगवंत पुरी याला अटक केली आणि त्याची चौकशी केली, त्यानंतर त्याने सांगितले की, त्याचा जावई अतुल पुरी गेल्या काही वर्षांपासून त्याच्या बहिणीचा

शारीरिक आणि मानसिक छळ करत होता. या कारणास्तव, राहुल पुरी यांनी त्याच्या जावयाला धडा शिकवला.त्याने अतुल पुरीला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी त्याने हे त्याचे मित्र प्रशांत बन्हाडे यांना सांगितले आणि त्याच्या मदतीने त्याने त्याच्या ओळखीच्या अक्षय शिंपी यांना त्याला मारण्याची सुपारी दिली. त्यासाठी अक्षय शिंपी आणि त्याचा मित्र गौरव कांबे यांनी राहुल पुरी आणि प्रशांत वऱ्हाडे यांच्याकडून ५ लाख रुपये घेतले आणि आरोपी साहिल मोहोड, सक्षम लांडे आणि एका अल्पवयीन मुलाला २ लाख रुपये देऊन अतुल पुरीला मारण्यास सांगितले. हे कळताच गुन्हेशाखेच्या पथकाने राहुल पुरी, प्रशांत वन्हाडे आणि गौरव गजानन कांबे यांना अटक केली. अटक केलेल्या आरोपींची संख्या ८ झाली आहे; परंतु अक्षय शिंपी अजूनही फरार आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत.ही कारवाई शहर पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे व रमेश धुमाल, सहायक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शन व पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात अमोल कडू, मनीष वाकोडे, महेश इंगोले व अनिकेत कासारसहा पुलिस सुनील लासूरकर, दीपक सुंदरकर, गजानन ठेवले, फिरोज खान, सतीश देशमुख, आस्तीक देशमुख, मनोज ठोसर, जहरी शेख, सचिन बहाले, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, अतुल लसंभे, नईम बेग, विकास गुडधे, नाझीमोद्दीन, विशाल वाकपांजर, राहुल देंगेकर, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले यांच्या पथकाने केली आहे.

# जन्म दाखल्यांच्या तपासासाठी विशेष पथक : पोलिस अधीक्षकांचे आदेश

अमरावती : जन्म दाखल्यांच्या प्रकरणातभाजपचे नेते डॉ. किरीट सोमय्या यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी अंजनगावसुर्जी येथे दोन, तर अचलपूर येथे एक गुन्हा दाखल केल्यावर या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी बुधवारी विशेष तपास पथकाचे (एसआयटी) गठण केले आहे.

अंजनगावसुर्जी येथे सहा फेब्रुवारी रोजी डॉ. किरीट सोमय्या यांनी तक्रार केली होती.

तसेच नायब तहसीलदार रवींद्र काळे यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनंतर दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते, तसेच नायब तहसीलदार जगदीश मंडपे यांच्या तक्रारीवरुन अचलपूर पोलिस ठाण्यात एक गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अंजनगाव येथील दोन, तर अचलपूरयेथील एका गुन्ह्याचा आढावा घेतला असता तिन्ही गुन्ह्यांचे स्वरूप सारखेच असल्याचे निदर्शनास येते. या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने व्हावा, याकरिता वरील तिन्ही गुन्हे एकाच ठिकाणी तपासावर ठेवून तपासासाठी स्वतंत्र पोलिस पथक गठित करणे आवश्यक असल्याने एसआयटी स्थापन करण्यात आली आहे.

# अप्परवर्धा धरण ९०.५३ टक्के; दरवाजे उघडण्याची शक्यता

## वर्धा नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

मोर्शीः मागील काही दिवसांपासून संपूर्ण राज्यात पावसाने जोर धरला असून नदी-नाले दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे धरणाच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. शहरापासून लगतच असलेल्या अप्परवर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातसुद्धा काही दिवसापासून पाऊस सुरू असल्याने अप्पर वर्धा धरणाची पाण्याची पातळी वाढलेली आहे. या धरणात सध्या ९०.५३ टक्के पाणीसाठा झाल्याने या धरणाचे दरवाजे कधीही उघडले जाऊ शकतात. त्यामुळे नदीकाठच्या लोकांनी सावधगिरीचा इशारा बाळगावा अशा सूचना प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या आहे.

अप्परवर्धा धरणाची पातळी वाढत असून या सोबतच वर्धा नदी खालील



भागातील नदी नाल्याचा विसर्ग नदीच्या पात्रामधे राहणार असल्यामुळे नदीच्या पाण्याच्या पातळीमध्ये आणखी वाढ होण्याचीशक्यता आहे. २७ ऑगस्टला ५ वाजता जलाशय पातळी ३४१.९० मी. असून साठ्याची टक्केवारी ९०.५३ टक्के इतकी आहे.धरणाच्या पाणलोट क्षेत्रात व धरणासमोरील क्षेत्रात होणाऱ्या अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता व तसेच धरणामध्ये येणाऱ्या येव्यानुसार व मंजूर धरण प्रचलन सूचीनुसार (३१ ऑगस्ट अखेर जलाशय पातळी ३४२.१० मीटर व पाणीसाठा ९३.५९ टक्के असा असल्यास) येणाऱ्या २४ ते ३६ तासामध्ये प्रकल्पातून केव्हाही विसर्ग वर्धा नदीपात्रात सोडण्यात येऊ शकते.

करिता वर्धा नदी काठावरच्या गावातील ग्रामस्थांना व मासेमारी करणाऱ्यांना सूचना देऊन नदीपात्रात जाण्यास मनाई करावी, तसेच सतर्कतेचा इशारा देण्यात यावा, अशा आशयाचे पत्र ऊर्ध्व वर्धा धरण उपविभाग १ कडून वरिष्ठांना पाठविण्यात आले आहे.

# कत्तलीसाठी जाणारे गोवंश पकडले; तीन आरोपींविरुध्द गुन्हे दाखल

अमरावती : कत्तलीसाठी जाणारे गोवंश पकडून शिरजगाव कसबा पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. २६ ऑगस्टरोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास पाळा ते शिरजगाव कसबा पांदण रस्त्याने स्मशानभूमीच्या मागे २ इसम ३ गोवंश कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जात होते. त्यांना निदर्यतेने मारहाणसुध्दा करण्यात येत होती. पोलिसांना याबाबत गुप्त माहिती मिळाली, त्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळावर जावून नाकाबंदी करून अंदाजे ४३ हजार रुपये किमतीचे गोवंश ताब्यात घेऊन आरोपी सर्फराज (३५) रा. शिरजगाव कसबा, बबलू जावरकर (३०) रा. पिपलनाका भैंसदेही व एक अनोळखी इसम या तिघांविरुध्द गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली आहे.ही कारवाई पोलिस आयुक्त विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी अचलपूर माधवराव



गरूड व गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलिस निरीक्षक महेंद्र गवई, अंमलदार दिपेश चंदेल, अर्जुन परिहार, अजय कुम्रे, योगेश राखोडे यांनी केली.

# कुंभमेळ्यातील व्हायरल गर्ल मोनालिसा या चित्रपटातून करणार पदार्पण



*प्रयागराज येथील कुंभमेळ्याच्या दरम्यान व्हायरल झालेल्या मोनालिसा या तरुणीचा चित्रपट लवकरच येतो आहे. प्रयागराज या ठिकाणी माळ विक्री करणाऱ्या मोनालिसाचं मूळ नाव मोनी भोसले असं आहे. तिचं सौंदर्य पाहून तिच्या सौंदर्याची भुरळ अनेकांना पडली होती. मोनालिसा ही मूळची इंदूर येथील आहे. महाकुंभमेळ्यात तिच्या लूकमुळे तिची चर्चा देशभरात झाली होती. याच मोनालिसाला चित्रपटाची ऑफर मिळाली आहे. तिचा चित्रपट आता लवकरच येतो आहे. मोनालिसा मल्याळम चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करते आहे.मोनालिसा नागम्मा या मल्याळम चित्रपटात झळकणार आहे. कैलाश या अभिनेत्यासह झळकणार आहे. पी. बिनू वर्गिस यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. तर जिली जॉर्ज यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. नागम्मा या चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होऊन ते सप्टेंबर महिन्याच्या शेवटापर्यंत संपणार असल्याची चिन्हं आहेत. या मल्याळम चित्रपटासंदर्भात जी पूजा करण्यात आली त्याचे फोटो मोनालिसा अर्थात मोनी भोसलेने पोस्ट केले आहेत.मोनिलासाचा एक व्हिडीओ जानेवारी महिन्यात चांगलाच व्हायरल झाला. त्यामुळे कुंभमेळ्यात तिचीही चर्चा रंगली. मोनालिसाचं सौंदर्य खरोखरच अप्रतिम आहे. मात्र तिच्यासह फोटो काढण्यासाठी, व्हिडीओसाठी, तिच्याशी बातचीत करण्यासाठी अक्षरशः त्रास दिला जातो आहोत. मोनालिसा माळा विक्रीचं काम करते पण तिच्या या व्यवसायावरही या सगळ्यामुळे परिणाम झाला आहे. प्रयागराजमध्ये गेल्यानंतर तिला प्रसिद्धी मिळाली. पण या प्रसिद्धीचा परिणाम तिच्या पोटापाण्याच्या व्यवसायावर होतो आहे. लोक तिला पाहिलं की तिच्या मागे लागतात.*

## महाराष्ट्रातील चार शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर



नवी दिल्ली : भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर केले असून, महाराष्ट्रातील चार शिक्षकांनी आपल्या उत्कृष्ट योगदानामुळे हा प्रतिष्ठित सन्मान प्राप्त केला आहे. शालेय आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील या शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, संशोधन आणि सामाजिक योगदानाद्वारे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा दिली आहे. हा पुरस्कार ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने देशभरातील २७ राज्ये, ७ केंद्रशासित प्रदेश आणि ६ संस्थांमधून ४५ शिक्षकांची निवड राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नांदेड येथील जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धपूर येथील डॉ. शेख मोहम्मद वकुओद्दीन शेख हमीदोद्दीन आणि लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ आर्टमधील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे यांचा समावेश आहे. या दोन्ही शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या समर्पित कार्यामुळे हा पुरस्कार मिळवला आहे. निवड प्रक्रिया पारदर्शी आणि कठोर स्वरूपाची असून, ती जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन स्तरांवर २३ जून ते २० जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने पार पडली. एकूण ४५ पुरस्कार विजेत्यांपैकी २४ पुरुष आणि २१ महिला शिक्षकांचा समावेश आहे.

उच्च शिक्षण विभागाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी देशभरातील २१ शिक्षकांची निवड केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबईतील शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. नीलाक्षी जैन आणि बारामती येथील एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग महाविद्यालयातील प्रा. पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, उच्च शिक्षणातील प्रेरक आणि सक्षम प्राध्यापकांना प्रोत्साहन देण्यासाठी २०२३ मध्ये या पुरस्काराची सुरुवात झाली. निवड प्रक्रियेत अध्यापन परिणामकारकता, समाजाभिमुख उपक्रम, संशोधन, नवोन्मेष आणि प्रायोजित संशोधन यासारख्या निकषांवर मूल्यमापन करण्यात आले. डॉ. जैन आणि प्रा. पवार यांनी आपल्या उत्कृष्ट अध्यापन आणि सामाजिक योगदानामुळे हा पुरस्कार प्राप्त केला आहे.

## महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमात सुधारणा

मुंबई : महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये चार सुधारणा व दोन नवीन कलमांचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास आणखी कठोर शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.




राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्त व्यवस्थांचे नियमन व त्यांच्या कारभारावर नियंत्रणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मध्ये करण्यात आला आहे.

या अधिनियमातील विश्वस्त या नावाची सर्वसमावेशक व्याख्या करणे आवश्यक होते, तसेच कलम ६६ अ व ६६ ब मध्ये आताच्या शिक्षा पुरेशा नसल्याचे आढळल्याने शिक्षेची तरतूद वाढवविणारी, धर्मादाय उपायुक्त अथवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या आदेशाविरुद्ध पुनर्विचार करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा कलम ७० अ मध्ये नव्हती. ती या नव्या सुधारणांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या अधिनियमातील कलम २ (१८) मधील 'विश्वस्त' या संज्ञेची सर्वसमावेशक व्याख्या समाविष्ट करण्यात येत असून, नियुक्तीच्या कालावधीनुसार विश्वस्तांच्या प्रकारांची ओळख निश्चित करण्यासाठी ती ग्राह्य धरण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच या कलम १८ मध्ये 'सार्वजनिक विश्वस्त संस्थांची नोंदणी' या विषयीचा उल्लेख आहे. उप-कलम (६) मध्ये सुधारणा केल्यानंतर आता फर्म नोंदणीसाठी अर्ज करताना विश्वस्त संस्थेची प्रत असणे आवश्यक आहे. यामुळे कोणत्याही मालमत्तेवर ट्रस्ट मालमत्ता म्हणून खोटा दावा करणे टाळता येणार आहे.

अधिनियमातील कलम ५० (ब) मध्येच कलम ८०, ५० अ, ६९ आणि ४७ या कलमांचे उल्लंघन करणारी एक तरतूद होती. ही परस्परविरोधी तरतूद रद्द करण्यास येणार आहे.

या अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास कलम ६६ अ नुसार 'साध्या कारावासाची शिक्षा' होती. त्याऐवजी आता 'कोणत्याही प्रकारच्या कारावासाची शिक्षा' व सक्तमजुरीची शिक्षेपर्यंतची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कलम ४१ अ अंतर्गत योजनेचे पालन करण्यासाठी कलम ६६ ब मधील आताच्या शिक्षेत तीन महिने किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही ऐवजी एक वर्ष किंवा दोन लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही अशी सुधारणा करण्यात येणार. उप किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाविरुद्ध सुधारणा अर्ज सादर करण्यास देखील आता विशिष्ट मुदत घालून देण्यात येणार आहे. अधिनियमातील सुधारणांच्या अध्यादेशाच्या प्रारूपास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

## नागपूर, अमरावती विभागातील नझुल जमिनींच्या विशेष अभय योजनेला एक वर्ष मुदतवाढ

मुंबई : नागपूर व अमरावती विभागातील निवासी वापरासाठी दिलेल्या नझुल जमिनींसाठीच्या विशेष अभय योजनेला आणखी एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.नागपूर व अमरावती विभागातील भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने शासनास अहवाल सादर केला आहे. त्यानुसार विशेष अभय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेस मुदतवाढ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येत होती. ज्या भाडेपट्टेदारांना या योजनेमध्ये आतापर्यंत विविध कारणांसाठी भाग घेता आला नाही, अशा सर्व भाडेपट्टेदाराना या योजनेत सहभागी होण्याची संधी प्राप्त व्हावी यासाठी या योजनेस एक वर्ष मुदतवाढ देण्यात येत आहे.

# दिल्लीत गणरायाचे भक्तिमय स्वागत

### खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते गणरायाची प्राणप्रतिष्ठा; महाराष्ट्र सदनासह मंडळांमध्ये उत्साहाचा जयघोष

नवी दिल्ली: राजधानी दिल्ली येथे आज 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या निनादात लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन झाले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी महाराष्ट्र सदनात गणरायाची विधिवत प्राणप्रतिष्ठा केली. महाराष्ट्र सदनासह दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांनी भक्तिमय वातावरणात गणरायाचे स्वागत केले.यंदा गणेशोत्सवाला महाराष्ट्रात राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने दिल्लीतील मराठी बांधवांमध्ये विशेष उत्साह आहे. पुढील दहा दिवस दिल्लीत भक्ती, उत्साह आणि मराठमोळ्या सांस्कृतिक जल्लोषाचे वातावरण राहणार आहे.



**महाराष्ट्र सदनात गणरायाचे स्वागत**

महाराष्ट्र सदनातील सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्यावतीने गणरायाची प्राणप्रतिष्ठा खा. डॉ श्रीकांत शिंदे यांनी केली. यावेळी निवासी आयुक्त आर. विमला, अपर निवासी आयुक्त निवा जैन, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या उपसंचालक मनिषा पिंगळे यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी आणि गणेशभक्त उपस्थित होते. सकाळी कोपर्निकस मार्गावर काढण्यात आलेल्या मिरवणुकीत 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर आणि मंत्रोच्चारांनी गणरायाची प्राणप्रतिष्ठा थाटामाटात संपन्न झाली.

गणरायाच्या स्वागताने दिल्लीत मराठी संस्कृतीचा ठसा पुन्हा एकदा ठळकपणे उमटला आहे. हा उत्सव भक्ती आणि सांस्कृतिक वैभवाचा अनुपम संगम असल्याचे खा. डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र सदनात गणेशोत्सवाचा उत्साह संपूर्ण दिल्लीला सांस्कृतिक रंगात रंगवणार आहे, असे निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी सांगितले.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणात आयोजित गणेशोत्सवाच्या निमित्ताने स्वयं सहायता गटांचे प्रदर्शन व विक्री स्टॉलला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. मराठी संस्कृती, हस्तकला आणि परंपरांचे दर्शन घडवणाऱ्या या स्टॉल्समुळे यंदाच्या उत्सवाला विशेष रंगत आली आहे. हा उत्सव मराठी समाजाला एकत्र आणण्यासोबतच दिल्लीतील इतर समुदायांनाही मराठी संस्कृतीची ओळख करून देतो, असे डॉ. शिंदे यांनी नमूद केले. बचत गटांच्या या प्रदर्शन आणि विक्री स्टॉल्समुळे स्थानिक कारागिरांना आणि छोट्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळाले असून, मराठी हस्तकलेची ख्याती दिल्लीत पोहोचली आहे.

**मराठी मंडळांमध्ये भक्तीचा उत्साह**

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तीपूर्ण जयघोषाने गणरायाचे स्वागत केले. यंदा गणेशोत्सवाला मिळालेल्या राज्य महोत्सवाच्या दर्जाने मराठी समाजाचा उत्साह द्विगुणित झाला आहे. दिल्लीतील मराठी बांधवांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून आपली सांस्कृतिक ओळख पुन्हा एकदा अभिमानाने अधोरेखित केली.

**सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने दिल्लीत सांस्कृतिक कार्यक्रमांचा जल्लोष अनुभवायला मिळणार आहे. विविध मराठी मंडळांनी महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारे कार्यक्रम आयोजित केले आहेत. मराठमोळ्या लावण्या, नाटक, संगीत रजनी, झांज पथकांचे सादरीकरण, कीर्तन, भजन संध्या आणि मराठी नाट्यप्रयोग यंदाच्या उत्सवात दिसणार आहेत. सर्व गणेशभक्तांचाही या उत्सवात मोठ्या प्रमाणात सहभाग आहे, ज्यामुळे दिल्लीत पुढील दहा दिवस भक्ती आणि उत्साहाचे वातावरण कायम राहील.

## पांढरी खानमपूरमध्ये संतप्त जनतेचा एल्गार

अंजनगाव सुर्जी दि. २७ : अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर गावात वीज वितरण कंपनीविरुद्ध संतापाचं वादळ उठलं आहे. घराघरात छुप्या पद्धतीने, बळजबरीने, संविधानिक हक्क पायदळी तुडवत स्मार्ट मीटर बसवल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वीज कंपनीने एकाही ग्राहकाला पूर्वसूचना दिली नाही, नोटीस दिली नाही. उलट जेव्हा ग्रामस्थांनी परवानगी न घेता मीटर का लावताय असा सवाल केला तेव्हा कर्मचाऱ्यांनी मोठा दंड बसेल अशी धमकी दिली. भीतीपोटी काहींनी ते लावून घेतले, पण आता या मीटरने गावकऱ्यांचा अक्षरशः गळा घोटला आहे. जुन्या मीटरमध्ये येणारे ४०० ते ५०० रुपयांचे बिल आता स्मार्ट मीटरमुळे थेट २३००, ३००० ते ५००० रुपयांवर पोहोचले. हे म्हणजे तीनशे टक्के वाढ! अवाजवी बिलामुळे वीज ग्राहक भरपाई करुच शकत नाहीत. अशी तक्रार ग्राहकांची आहे.







गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक – बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती–६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com. (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)